प्रेस नोट दि.17/01/2022

# खुनाच्या गुन्हायतील आरोपीला शिरपुर पोलीसांनी ठोकल्या 24 तासात बेडया .

दि.16/01/2022 रोजी फिर्यादी नामे कचरुलाल जोधराज मुंदडा रा.शिरपुर यांनी दिलेल्या फिर्याद दिली होती की,दि.14/01/2022 रोजी सायंकाळी 05/00 वा.च्या सुमारास त्याचा पुतण्या मृतक नामे चेतन धोंडुलाल मुंदडा वय 20 वर्ष याला आरोपी नामे श्रीकांत महादेव गोरे याने त्याच्या दुकातातुन त्याच्या सोबत घेवुन गेला होता.परंतु रात्र होवुन सुद्दा दोघे घरी आले नव्हते त्या मुळे त्यांनी पोलीस स्टेशन शिरपुर येथे त्याच्या पुतण्या हरविल्या बाबद नोंद केली होती.दि.16/01/2022 रोजी फिर्यादी यास फोन व्दारे माहीती मिळाली की,एक पुरुष जातीचे प्रेत नामे महादेव गोरे यांच्या शेतातील विहरीमध्ये पाण्यावर तरंगतांना दिसत आहे. म्हणुन फिर्यादी हा त्याच्या नातेवाईकांनसह त्याठीकाणी गेला .पोलीसांना प्रेत वर काढले तेव्हा फिर्यादीने सदर प्रेत त्याचा पुतण्या नामे मुरलीधर उर्फ चेतन धोडुलाल मुंदडा याचे असल्याचे सांगितले .त्यांचा पुतण्या यास आरोपी ने डोक्यात शस्त्राने मारहान करुन जख्मी केले.व जिवाने मारण्याचे उद्देशाने विहरित ढकलुन दिली.अशा रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन शिरपुर येथे अपराध क्रमांक 12/22 कलम 302,364 भां.द.वी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.परंतु सदर गुन्ह्याती आरोपी हा गुनह्या केल्या पासुन फरार होता.

सदर गुन्हयाचा मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंग साहेब ,अप्पर पोलीस अधिक्षक श्री.गोरख भामरे साहेब, मा.उपविभागिय पोलीस अधिकारी श्री.सुनिलकुमार पुजारी साहेब,यांनी दिलेल्या सुचना व केलेल्या मारगदर्शना प्रमाने शिरपुर पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री. सुनिल वानखडे यांनी सपोनि.जगदिश बांगर,नापोकाँ.पाईकराव पोकाँ.मनोज काकडे, मनोज ब्राम्हण,गौरीशंकर तेलंगे,असे तपास पथक गठित करुन आरोपी शोध कामी तात्काळ रवाना केले. सदर पथकाने परिश्रम घेवुन आरोपीला 24 तासाच्या आत अटक केली.

सदर गुन्ह्याचा तपास मा.पोलीस अधिक्षक श्री.बच्चन सिंग साहेब ,मा.अप्पर पोलीस अधिक्षक श्री.गोरख भामरे सर,मा.उपविभागिय पोलीस अधिकारी श्री.सुनिलकुमार पुजारी साहेब,पोलीस निरिक्षक सुनिल वानखडे साहेब यांचे मार्गदर्शनात शिरपुर पोलीस स्टेशनचे तपास पथक सहायक पोलीस निरिक्षक जगदिश एम.बांगर ,पोहवा.संतोष पाईकराव,पोकाँ.मनोज काकडे,गौरीशंकर तेलंगे,मनोज ब्राम्हण,रामेश्वर जोगदंड यांनी सजर गुनह्यात महत्वाची भुमीका पार पाडली. पुढील तपास सपोनि.बांगर हे करित आहेत.

पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन,शिरपुर
जि.वाशिम